# बोदवडचे ४ विद्यार्थी कुस्ती स्पर्धेतील यशाचे मानकरी

## शेंदुर्णी येथील गरुड महाविद्यालयात रंगला होता फड



कुस्ती स्पर्धेत यशस्वी खेळाडूंसोबत प्राचार्य डॉ.अरविंद चौधरी व सहकारी.

**प्रतिनिधी** | बोदवड

गेल्या २७ सप्टेंबरला शेंदुर्णी (ता.जामनेर) येथील गरूड महाविद्यालयाच्या इनडोअर स्टेडियममध्ये आयोजित विभागीय कुस्ती स्पर्धेत बोदवड येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या चौघांनी घवघवीत यश संपादन केले.

बोदवडचा संघ फ्रिस्टाईल व ग्रिको रोमन या दोन क्रीडा प्रकारात प्रा.किशोर पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली व गौरव शिरसाठ यांच्या नेतृत्वात स्पर्धेत सहभागी झाला होता. त्यात स्वप्नील थोरात याने ५७ किलो गटात फ्रिस्टाईल, पवन गावंडे याने ७४ किलो गटात फ्रिस्टाईल, पुरुषोत्तम पाटील याने ७७ किलो गटात ग्रिको रोमन, सागर पाटील याने ८२ किलो गटात ग्रिको रोमन या प्रकारात यश मिळवले.

या सर्व विजयी खेळाडूंची कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या विभागीय स्पर्धा एरंडोल येथील पाटील महाविद्यालयात होतील. यशस्वी खेळाडूंना प्रा.किशोर पाठक यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य अरविंद चौधरी, उपप्राचार्य देवसिंग पाटील, संस्थेचे चेअरमन मिठुलाल अग्रवाल, अजय जैन, विकास कोटेचा, जिमखाना कमिटी सदस्यांनी कौतुक केले.